पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८३९ दिनांक - ०१/१२/२०२३**

हडपसर पोलीस ठाणे पुणे शहर

## मौजमजेकरीता घरफोडी करणा-यांना तीन विधीसंघर्षीतांना घेतले ताब्यात, त्यांचेकडुन ०४ घरफोडीचे गुन्हे उघड

हडपसर पोलीस ठाणे हद्दीतील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणेकरीता हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.रविंद्र शेळके यांनी तपास पथकाचे पोलीस अधिकारी / पोलीस अंमलदार यांची मिटींग घेवून घरफोडी गुन्हे उघड करण्यासाठी आराखडा तयार केला.

हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं.१८१५/२०२३,भा.दं.वि.कलम ३८० मधील फिर्यादी यांचे लोहीया गार्डन मगरपट्टा चौक,हडपसर,पुणे या ठिकाणी असलेल्या स्टोअर रुम व ऑफीस रुमच्या मध्ये ठेवलेले लॅपटॉप व पॉलीकॅब कंपनीच्या वायरचे बंडल चोरी केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक,विजयकुमार शिंदे, पोलीस उप-निरीक्षक,अविनाश शिंदे व पोलीस अंमलदार,प्रशांत दुधाळ, भगवान हंबर्डे असे दाखल गुन्ह्या संदर्भाने माहीती घेत असताना, त्यांना तपासा दरम्यान प्राप्त झालेल्या आरोपींचे वर्णनाबाबत पोलीस अंमलदार,प्रशांत दुधाळ, भगवान हंबर्डे यांना मिळालेल्या बातमीचे आधारे **तीन विधीसंघर्षित बालक यांना ताब्यात घेवुन,**त्यांचेकडे केले तपासात त्यांनी दाखल गुन्हा तसेच हडपसर पोलीस ठाणे हद्दीत वेळोवेळी घरफोडीचे गुन्हे केल्याची माहीती दिली. सदरचे गुन्हे हे त्यांनी मौज-मजेकरीता पैशांची आवश्यकता असल्याने केले असल्याचे सांगीतले आहे.

त्यांचेकडुन पुढीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत. १)हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर गु.र.नं. ७४५/२०२३,भा.दं.वि.कलम ४५४,४५७,३८० २) हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर गु.र.नं.९१६/२०२३,भा.दं. वि.कलम ४५७,३८० ३)हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर गु.र.नं.१५९३/२०२३,भा.दं.वि.कलम ४५७,३८० ४) हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर गु.र.नं.१८१५/२०२३,भा.दं.वि.कलम ३८० प्रमाणे

सदर विधीसंघर्षित बालक यांचेकडून दाखल गुन्ह्यातील चोरीस गलेला लॅपटॉप व पॉलीकॅब वायर, दुचाकी व इतर साहीत्य असा या किं.रू १,८२,०००/- चा हस्तगत करण्यात आल्या आहे.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०५,पुणे,श्री.विक्रांत देशमुख यांचे मागदर्शनाखाली मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे,श्रीमती.अश्विनी राख, हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.रविंद्र शेळके पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विश्वास डगळे, श्री.संदीप शिवले यांचे सुचनेप्रमाणे तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक,विजयकुमार शिंदे, पोलीस उप-निरीक्षक,अविनाश शिंदे,पोलीस अंमलदार,सुशील लोणकर,संदीप राठोड,समीर पांडुळे,जोतीबा पवार,सचिन जाधव,जोतीबा पवार, शाहीद शेख,प्रशांत दुधाळ,निखील पवार,अतुल पंधरकर,भगवान हंबर्डे,सचिन गोरखे,प्रशांत टोणपे, अजित मदने,चंद्रकांत रेजीतवाड,अमोल दणके,कुंडलीक केसकर,रशिद शेख यांचे पथकाने केली आहे.